# मिरा भाईंदर महानगरपालिका

मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे - ४०११०१ दुरध्वनी क्र. २८१८११८२, २८१९२८२८.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/कर/ २८ /२४-२५ दि. २८/०४/२०२४

प्रति,
जनसंपर्क अधिकारी
जनंसपर्क विभाग

विषय :- मालमत्ता कर वसूली बाबतचे प्रेसनोट प्रसिद्ध करणे बाबत.

मिरा भाईंदर परिसरातील बहुतांश नागरीक हे नोकरदार वर्ग असल्याने कार्यालयीन वेळेत त्यांना मालमत्ता कराचा भरणा करणेस शक्य होत नसल्याने मालमत्ता कराचा भरणा करणेस अधिक सोईचे होणेकरीता मा. आयुक्त श्री. संजय श्रीपतराव काटकर, भा.प्र.से. यांनी दि. २९/०४/२४ व दि. ३०/०४/२४ या सलग सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कराचा भरणा स्विकारणेकरीता सर्व प्रभाग/ विभागीय कार्यालय सुरु ठेवण्याचे निर्देश दिले असून त्यानुसार सदर कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी मालमत्ता कराचा भरणा स्विकारण्यात येणार आहे.

सदर बाबतची व्यापक प्रसिद्धी होणेकरीता प्रेसनोट तयार करण्यात आले असून सदर प्रेसनोटची वृत्तपत्रात तसेच महानगरपालिकेचे संकेतस्थळ व सामाजिक प्रसारमाध्यम येथे प्रसिद्धी करण्यात यावे.

सोबत :- प्रेसनोट

(डॉ. संभाजी पानपट्टे)
अतिरीक्त आयुक्त (कर)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# ॥ प्रेस नोट ॥

सन २०२४-२५ या आर्थिक वर्षाचे मालमत्ता कराचे देयके वाटप केले असून मालमत्ता कराची वसूलीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

मालमत्ता कराची वसूली अधिक होणेकरीता महानगरपालिकेने जून २०२४ अखेर पर्यत मालमत्ता कराचा संपूर्ण भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना मालमत्ता करात ५% व जुलै २०२४ अखेर पर्यंत संपूर्ण भरणा करणाऱ्या मालमत्ता धारकांना ३% सवलत देण्याचे जाहिर केलेले आहे.

त्याअनुषंगाने सदर सवलतीचा लाभ घेणेकरीता नागरीक मोठया प्रमाणावर गर्दी करीत असून मालमत्ता कराचा भरणा करणेकरीता सर्व मालमत्ता कर भरणा केंद्रावर गर्दी होत आहे.

तसेच जास्तीत जास्त नागरीकांना सदर सवलतीचा लाभ घेता यावा या करीता दि. २९/०६/२०२४ व दि. ३०/०६/२०२४ या कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी सुद्धा मालमत्ता कर भरणा केंद्र सुरु ठेवण्याचे निर्देश दिले असून त्यानुसार दि. २९/०६/२०२४ व दि. ३०/०६/२०२४ या कार्यालयीन सुट्टीच्या दिवशी देखील सकाळी १०:०० ते दु. ०४:०० वाजेपर्यंत मालमत्ता कराचा भरणा स्विकारण्यांत येणार आहे.

मालमत्ता कराचा भरणा मोबाईलव्दारे करण्याकरीता महानगरपालिकेने **My MBMC** या ॲपची निर्मिती केलेली असून **Playstore** वरुन सदरचे ॲप डाऊनलोड करुन या सेवेचा लाभ घ्यावा. तसेच **www.mbmc.gov.in** या संकेतस्थळावरुन देखील मालमत्ता कराचा ऑनलाईनव्दारे भरणा करणेकरीता सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेली असून नागरीकांनी मालमत्ता कराचा भरणा करुन महानगरपालिकेस सहकार्य करावे ही विनंती.